॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)


## जनसंपर्क विभाग

जळगाव २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस (पॉलीमर केमिस्ट्री व ऑरगॅनिक केमिस्ट्री) मधील दोन विद्यार्थ्यांची निवड चेंबुर, मुंबई येथील गॉर्गी ह्युटन्स अलबरटस प्रा. लि. या कंपनीसाठी झाली.

एम.एस्सी. पॉलिमर केमिस्ट्री व एम.एस्सी. ऑरगनिक केमिस्ट्रीच्या विद्यार्थ्यांसाठी परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीचे उपाध्यक्ष श्री. बळवंत चौधरी हे उपस्थित होते. २० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन मुलाखत दिली होती. या पैकी प्रियंका पाटील (पॉलिमर केमिस्ट्री) व संदीप राजपुत (ऑरगनिक केमिस्ट्री) या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांना वार्षिक वेतन रू. ४.०० लाख देण्यात आले. कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर श्रीमती सोनाली दायमा यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले. केमिकल सायन्सेसचे डॉ. अमरदिप पाटील, डॉ. विकास गिते यावेळी उपस्थित होते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा. धनंजय मोरे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी नं. २**

जळगाव २४ (प्रतिनिधी) प्राचीन काळापासून स्त्रियांना पितृसत्ता आणि धर्मसत्तेच्या द्वारे दुय्यम दर्जा देण्यात आला. भारतातील अनेक समाज सुधारक यांच्या लढयामुळे स्त्री, ही पुरुषी बंधनात अडकलेली होती. भारतीय संविधान आणि हिंदु कोड बिल यातील स्त्री मुक्ती विषयक तरतुदीमुळे आज स्त्रिया सर्व क्षेत्रात प्रगती करीत आहे. म्हणून स्त्रियांनी सर्वांगीण विकासासाठी संविधानिक स्त्री स्वातंत्र्य विषयक तरतुदी विषयी जागरूक रहावे असे प्रतिपादन डॉ. सुकेशनी थोरात यांनी आज कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने 'भारतीय संविधानातील स्त्री स्वातंत्र्य विषयक तरतुदी' या विषयावर विशेष व्याख्यानाप्रसंगी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. राकेश रामटेके हे होते. तर डॉ. विजय घोरपडे,डॉ. कविता पाटील, डॉ. अभय मनसेरे, डॉ. बाळासाहेब सुर्यवंशी, प्रा. सावंत सर, प्रा. पालखे मॅडम, प्रा. विनेश पावरा यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा. डॉ. रामटेके यांनी महिला मुक्तीसाठी अशा व्याख्यानाची गरज आहे असे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कु. सुकन्या जाधव हिने स्वागत गीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश माळी यांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. विजय घोरपडे यांनी केले. डॉ. अभय मनसरे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. यावेळी सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

…………………………………………………………………………………………………………………..

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २४ एप्रिल, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता